असा. क्र. ४०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, ऑक्टोबर २३, २००८/कार्तिक १, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**—मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. .. | **३७३-३७७** |

**गृह विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ ऑक्टोबर २००८.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IX OF 2008.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY POLICE ACT, 1951.

**सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५१ चा मुंबई २२. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २००८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.



भाग चार—७९

**[किंमत : रुपये १५.००]**

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

**२.** मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आलेला आहे) याच्या कलम ५१ मध्ये,— १९५१ चा मुंबई २२.

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१) जेव्हा एखाद्या बेकायदेशीर जमावाने आपले समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे कोणत्याही मालमत्तेची हानी किंवा तिचे नुकसान झाले असेल, किंवा जेव्हा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना मृत्यू आला असेल किंवा जबर दुखापत झाली असेल, तेव्हा, जिल्हा दंडाधिकाऱ्यास, आदेशाद्वारे,—

(क) ज्या क्षेत्रात त्याच्या मते, असा बेकायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र (यात यापुढे " अशांत क्षेत्र " असे संबोधण्यात आले) ;

(ख) असा बेकायदेशीर जमाव ज्या दिनांकास किंवा ज्या कालावधीत जमला असेल तो दिनांक किंवा तो कालावधी,

विनिर्दिष्ट करता येईल. ";

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " राज्य शासनाचा " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये, " पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, बृहन्मुंबईमध्ये मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास, व जिल्ह्यात जिल्हा दंडाधिकाऱ्यास महसूल आयुक्ताच्या पूर्वमंजुरीने " या मजकुराऐवजी, " पोट-कलम (१) अन्वये आदेश काढण्यात आल्यानंतर, जिल्हा दंडाधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) " मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याला, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्याला " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (क) व (ख) मध्ये, " जिल्हाधिकारी किंवा कोणताही अन्य प्राधिकारी यास " हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे तेथे या मजकुराऐवजी, " किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला कोणताही अन्य प्राधिकारी यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (ग) मध्ये, " जिल्हाधिकारी किंवा कोणताही अन्य प्राधिकारी यास " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) " किंवा विशेषकरून उक्त क्षेत्रातील " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " किंवा पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे बेकायदेशीर जमावातील व्यक्तींकडून, किंवा विशेषकरून उक्त क्षेत्रातील अशा व्यक्तींच्या कोणत्याही विवक्षित गटाकडून किंवा गटांकडून, किंवा वर्गाकडून किंवा वर्गांकडून अशा भरपाईच्या रकमेच्या जास्तीत जास्त तीन टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी जादा रक्कम (यात यापुढे ज्याचा निर्देश " नगरपालिका वसुली खर्च " असा करण्यात आला आहे) " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (४क) पोट-कलम (३) अन्वये ठरविण्यात आलेली नुकसान भरपाईची रक्कम, संपूर्णपणे किंवा अंशतः, ज्यांच्याकडून वसूल करावयाची आहे अशा व्यक्तींकडून किंवा व्यक्तींच्या गटाकडून किंवा व्यक्तींचे गटांकडून किंवा अशा व्यक्तींच्या वर्गाकडून किंवा वर्गांकडून, ज्या

क्षेत्रात ते राहत आहेत ते क्षेत्र आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेरचे क्षेत्र आहे असे जर जिल्हा दंडाधिकाऱ्याचा निदर्शनास आले तर, तो जिल्हा दंडाधिकारी, ती रक्कम वसूल करण्यासाठी, अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट किंवा व्यक्तींचे गट किंवा अशा व्यक्तींचा वर्ग किंवा व्यक्तींचे वर्ग, ज्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रात रहात असतील त्या जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे आपल्या अहवालासोबत माहिती पाठवील. अशी माहिती मिळाल्यावर, अशा क्षेत्राचा जिल्हा दंडाधिकारी, या कलमान्वये तरतूद केलेल्या रीतीने नुकसान भरपाईची रक्कम वसूल करील." ;

(च) पोट-कलम (५) मध्ये,—

(एक) खंड (एक) मध्ये, " यथास्थिति, मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, जिल्हा दंडाधिकारी याला " या मजकुराऐवजी " जिल्हा दंडाधिकाऱ्याला " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (दोन) मध्ये, " मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(छ) पोट-कलम (८) मध्ये, " मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्या ऐवजी, " जिल्हा दंडाधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ज) पोट-कलम (९) मध्ये, " मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी " जिल्हा दंडाधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(झ) पोट-कलम (१०) मध्ये, " यथास्थिति, मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ञ) पोट-कलम (१०) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (११) या कलमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कायद्याच्या कोणत्याही तरतुदींच्या व्यतिरिक्त असतील आणि त्यांना न्यूनकारी असणार नाहीत.".

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये,— सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये, " मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्याने, महसूल आयुक्ताच्या पूर्व मंजुरीने " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेच्या " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याने काढलेल्या आदेशाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी यांची " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याची " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४) मध्ये, " मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) समास टीपेमध्ये " मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५३ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये,—

(एक) " मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) समास टीपेमध्ये, " मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी, " जिल्हा दंडाधिकाऱ्याने " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन

विविध राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि अशासकीय संघटना आपल्या समस्यांविषयीचा आपला असंतोष प्रकट करण्यासाठी आंदोलने करत असतात. काही वेळा या आंदोलकांचे बेकायदेशीर जमावामध्ये रूपांतर होते आणि या बेकायदेशीर जमावाकडून जिवीतहानी बरोबरच सार्वजनिक तसेच खाजगी मालमत्तेचे नुकसान केले जाते. दिवसेंदिवस राज्यातील अशा घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) याच्या कलम ५१ मधील बेकायदेशीर जमावाकडून करण्यात आलेल्या नुकसानाची भरपाई देण्यासंबंधीच्या विद्यमान तरतुदी ह्या वेळखाऊ असल्याचे आणि परिणामकारक नसल्याचे आढळून आले आहे. उक्त तरतुदींची प्रभावी आणि सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित करून त्याद्वारे परावर्तक परिणाम साध्य करण्यासाठी व अशा घटनांना आळा घालण्यासाठी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मध्ये योग्य त्या सुधारणा करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

२. राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २३ ऑक्टोबर २००८.

**एस. सी. जमीर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चित्कला झुत्शी,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ६४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, ऑक्टोबर २३, २००८/कार्तिक १, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Police (Amendment) Ordinance, 2008 (Mah. Ord. IX of 2008) is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H.B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Bombay Police (Amendment) Ordinance, 2008 (Mah. Ord. IX of 2008), published under the authority of the Governor).

---

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd October 2008.

### MAHARASHTRA ORDINANCE NO. IX OF 2008.

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Police Act, 1951.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Police Act, 1951, for the purposes hereinafter appearing ;

Bom. XXII of 1951.



[किंमत : रुपये १५.००]

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Bombay Police (Amendment) Ordinance, 2008.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 51 of Bom. XXII of 1951.

**2.** In section 51 of the Bombay Police Act, 1951 (hereinafter referred to as " the principal Act "),— Bom. XXII of 1951.

(*a*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

" (*1*) When any loss or damage is caused to any property or when death results or grievous hurt is caused to any person or persons, by anything done in the prosecution of the common object of an unlawful assembly, the District Magistrate may, by order, specify,—

(*a*) the area (hereinafter called " the disturbance area "), in which in his opinion such unlawful assembly was held ;

(*b*) the date on which or the period during which such unlawful assembly was held.";

(*b*) in sub-section (*2*), for the words " State Government " the words " District Magistrate " shall be substituted ;

(*c*) in sub-section (*3*), for the words, brackets and figure " issue of a notification under sub-section (*1*), the Chief Presidency Magistrate in Greater Bombay, and the District Magistrate in district, with the previous sanction of the Revenue Commissioner," the words, brackets and figure " issue of an order under sub-section (*1*), the District Magistrate " shall be substituted ;

(*d*) in sub-section (*4*),—

(*i*) for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be, " the words " District Magistrate " shall be substituted ;

(*ii*) in clauses (*a*) and (*b*), for the words ", the Collector or any other authority ", wherever they occur, the words " or any other authority authorised by the Collector " shall be substituted ;

(*iii*) in clause (*c*), for the words " the Collector or any other authority " the words " any authority authorised by the Collector " shall be substituted ;

(*iv*) for the words " or specially from any particular section or sections, or class or classes of such persons in the said area, and in such proportion as the Chief Presidency Magistrate or " the words, brackets and figure " or the members of the unlawful assembly as specified in sub-section (*1*), or specially from any particular section or sections, or class or classes of such persons and in such proportion as " shall be substituted ;

(*e*) after sub-section (*4*), the following sub-section shall be inserted, namely :—

" (*4A*) If the District Magistrate observes that the amount of compensation as determined under sub-section (*3*), either in whole or in part is to be recovered from persons or section or sections or class or classes of such persons are inhabitants of the area, which is beyond the area of his jurisdiction, the District Magistrate, shall send the information, along with his report, to the District Magistrate of the district in whose jurisdiction such persons or section or sections or class or classes of such persons are residing, to recover the amount from them. On receiving such information, the District Magistrate of such area shall recover the amount of compensation in the manner as provided under this section. ";

(*f*) in sub-section (*5*),—

(*i*) in clause (*i*), for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be," the words " District Magistrate " shall be substituted ;

(*ii*) in clause (*ii*), for the words " Chief Presidency Magistrate, or the District Magistrate, as the case may be," the words " District Magistrate " shall be substituted ;

(*g*) in sub-section (*8*), for the words " Chief Presidency Magistrate, or the District Magistrate, as the case may be," at both the places, where they occur, the words " District Magistrate " shall be substituted ;

(*h*) in sub-section (*9*), for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be " the words " District Magistrate " shall be substituted ;

(*i*) in sub-section (*10*), for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be " the words " District Magistrate " shall be substituted ;

(*j*) after sub-section (*10*), the following sub-section shall be added, namely :—

" (*11*) The provisions of this section shall be in addition to, and not in derogation of, the provisions of any other law for the time being in force.".

**3.** In section 52 of the principal Act,— Amendment of section 52 of Bom. XXII of 1951.

(*a*) in sub-section (*1*), for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be, with the previous sanction of the Revenue Commissioner " the words "District Magistrate" shall be substituted ;

(*b*) in sub-section (*2*),—

(*i*) for the words " the notification issued by the State Government " the words " the order issued by the District Magistrate " shall be substituted ;

(*ii*) for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be," the words " the District Magistrate " shall be substituted ;

(*c*) in sub-section (*4*), for the words " Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be," the words "District Magistrate" shall be substituted ;

(*d*) in the marginal note, for the words "Chief Presidency Magistrate or District Magistrate" the words "District Magistrate" shall be substituted.

Amendment of section 53 of Bom. XXII of 1951.

**4.** In section 53 of the principal Act,—

(*i*) for the words "Chief Presidency Magistrate or the District Magistrate, as the case may be," the words "District Magistrate" shall be substituted ;

(*ii*) in the marginal note, for the words "Chief Presidency Magistrate or District Magistrate" the words "District Magistrate" shall be substituted.

## STATEMENT

The agitations made by various political, social, religious, educational and non-Government Organizations to show their discontentment about their problems, sometimes lead to unlawful assembly which causes damages to the public property as well as private property including the loss of lives. Such instances are at rampant increase in the State. The existing provisions of section 51 of the Bombay Police Act, 1951 (Bom. XXII of 1951), regarding grant of compensation for injury caused by unlawful assembly are found to be time consuming and not effective. In order to ensure the effective and smooth implementation of the said provisions and thereby to achieve the deterrent effect, the Government of Maharashtra considers it expedient further to amend the Bombay Police Act, 1951, suitably.

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Police Act, 1951, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 23rd October 2008.

S. C JAMIR,
Governor of Maharashtra.

By order and in the name of
the Governor of Maharashtra,

CHITKALA ZUTSHI,
Additional Chief Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई